प्रेषक :- दुरध्वनी विभाग,भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

प्रति :- मा. नगरसचिव, विभाग

प्रस्तावना

भिवंडी नि.शहर महानगरपालिका दुरध्वनी विभागातर्फे सन २०२२-२०२३ या अंदाजपत्रकीय वित्तीय वर्षात दुरध्वनी निगा व दुरूस्ती करणेकामी रक्कम रू. १० लाख मात्र तरतुद करण्यात आली आहे. माहे जुन २०२२ अखेर पर्यंत प्रत्यक्षात या लेखा शिर्ष अंतर्गत झालेला खालील प्रमाणे खर्च

| अ.क्र. | कामाचा तपशील | खर्च रक्कम |
|---|---|---|
| ०१ | मनपा अतंगर्त दुरध्वनी निगा व दुरूस्ती केबल व इतर साहित्य पुरविणेकामी प्रस्ताव | १,९९,४२०/- |
| ०२ | मनपाच्या सर्व ईपीअेबीक्स मशीन निगा दुरूस्ती कामी प्रस्ताव | २,९९,७२०/- |
| ०३ | सन २०२१-२०२२ वर्षातील मनपा मुख्यालयातील एल.जी.आरीया ईपीअेबीक्स मशीन निगा व दुरूस्ती वार्षीक देयक | २,०१,८३९/- |
| ०४ | सन २०२१-२०२२ वर्षातील मनपा प्रभाग समिती क्रमांक १ ते ५ मधील दुरध्वनी नीगा व दुरूस्ती वार्षीक देयक | १,८१,७२०/- |
| | एकूण | ८,८२,६९९/- |
| | मुळ अर्थसंकल्पीय रक्कम रू | १०,००,०००/- |
| | शिल्लक | १,१७,३०१/- |
| | सन २०२१-२०२२ मनपा मुख्यालयामधील बी.एस.एन.एल केबल निगा दुरूस्ती कामी रक्कम | रू.१,८९,५९७/- चे देयक अद्याप देणेबाकी आहे. |

तसेच सन २०२२-२०२३ या वर्षातील अजुन नऊ महिनेचा कालावधी बाकी आहे. या दरम्यान सर्व पदाधिकारी, तसेच अधिकारी यांचेकडील दुरध्वनी दुरूस्ती, तातडीचा दुरूस्तीचा खर्च करावा लागणार आहे. तसेच या वर्षात पालीका निवडणूक कार्यक्रम आहे त्यावेळेला देखील तातडीने दुरध्वनी सेवा पुरवावी लागणार आहे. या सर्व बाबी लक्षात घेता सध्या असलेल्या शिल्लक अंदाजपत्रकीय रक्कम यामधून सदरचे काम करणे अशक्य आहे.

दुरध्वनी देयक अदा करणे याकामी रक्कम मुळ अंदाजपत्रकीय तरतुद रू. २० लाख पान नं.१७ ) करण्यात आली आहे. सदर २० लाख रू रक्कम या वर्षातील दुरध्वनी देयक अदा करण्यासाठी पुरेशी आहे. दरवर्षी वार्षीक दुरध्वनी देयके अंदाजे रू.१२ लाख पर्यंत खर्च येतो. सन २०२१-२०२२ या वर्षातील प्रत्यक्षात झालेला खर्च १०,८१,४१३/- झाला आहे. त्यानुसार मुळ अंदाज पत्रकातील रक्कम रू.८ लाख शिल्लक राहते.

त्यामुळे दुरध्वनी देयके या लेखा शिर्षातून रक्कम रू. ८.०० लाख दुरध्वनी निगा व दुरूस्तीकरणेकरीता मुळ अंदाजपत्रकातील लेखा शिर्षात रक्कम रू.८ लाख रु वाढ करून मिळणेस विनंती आहे. अंदाजपत्रकीय पुर्नविनायेजन करणे आवश्यक आहे. याकामी रक्कम रू. ८ लाख दुरध्वनी देयक यामधून दुरध्वनी निगा व दुरूस्ती या लेखा शिर्षात वर्ग करणेकामी प्रस्तावित आहे. यास दुरध्वनी विभाग प्रमुख, विद्युत अभियंता, उपायुक्त (मुख्यालय), मुख्य लेखा व वित्त अधिकारी, अति. आयुक्त, यांनी सदर प्रस्तावास तसेच विवरण पत्र नमुना क्र.१० नियम ३०(३) मान्यता दिली आहे. त्यानुसार खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात येत आहे.

ठराव नं ३२ दिनांक - ०३/१०/२०२२

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एम.सी.ओ. २०२०/ ७१ (भाग -२) /नवि-१४, दिनांक ६/६/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांतील कलम ४५२ अ (१ अ) तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका. दुरध्वनी व्यवस्थापक यांनी प्रस्तावित केल्यानुसार व विद्युत अभियंता, उपायुक्त (मुख्यालय), मुख्य लेखा व वित्त अधिकारी, अति. आयुक्त, यांनी शिफारस केल्यानुसार दुरध्वनी विभागाकरीता मुळ अंदाजपत्रकीय तरतुद रू. २० लाख पान नं.१७ ) करण्यात आली होती. सदर २० लाख रू रक्कम या वर्षातील दुरध्वनी देयक अदा करण्यासाठी पुरेशी आहे. वार्षीक दुरध्वनी देयके अंदाजे रू.१२ लाख पर्यंत खर्च येतो. सन २०२१-२०२२ या वर्षातील प्रत्यक्षात झालेला खर्च १०,८१,४१३/- झाला आहे. त्यानुसार मुळ अंदाज पत्रकातील रक्कम रू.८ लाख शिल्लक राहते. दुरध्वनी देयके या लेखा शिर्षातून रक्कम रू. ८.०० निधी पुनर्विनियोजन प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांचे कलम १०३ व लेखा संहिता १९७१ मधील नियम ३० (३) अन्वये सोबत नमुना क्र.१० नियम ३०(३) करणेस अंदाजपत्रकीय पुर्नविनियोजन करणेस मान्यता देण्यात येत आहे.

(विजयकुमार म्हसाळ )
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका